# जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

## P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

THANE POLICE COMMISSIONERATE


प्रेस नोट क्रमांक - दिनांक - ०८/०५/२०२४

# गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी ची कामगिरी

## “ घरफोडी चोरी करणाऱ्या गुन्हेगारास अटक, घरफोडी चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणुन ४,९१,८००/- रू. चा मुद्देमाल हस्तगत ”

———————————०००००००००———————————

नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे घरफोडी चोरीच्या गुन्हयात वाढ झाली असुन गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढविणेबाबत मा. पोलीस आयुक्त, ठाणे श्री. आशुतोष डुंबरे गुन्हे आढावा बैठकीमध्ये आदेश दिले होते. त्याअनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे डॉ. श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे श्री. शिवराज पाटील मा. सहा. पोलीस आयुक्त, शोध - १, गुन्हे ठाणे, श्री. निलेश सोनावणे यांच्या मार्गदर्शावरून मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. योगेश आव्हाड यांनी गुन्हे शाखा घटक २, भिवंडी चे अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने तपास करीत असताना पोशि/ उमेश ठाकुर यांना मिळालेल्या बातमीच्या आधारे आरोपी नामे १) आसीफ सत्तार शेख, वय २५ वर्षे, रा. स्वत:चे घर, आसरा हॉटेलच्या बाजुला, मिठपाडा, शेलार गांव, ता. भिवंडी, जि. ठाणे, २) सुफिया अमान खान, वय २१ वर्षे, रा. रूणावल माय सिटी, टॉवर नंबर अे/४, रूम नंबर २२०३, मानपाडा - दिवा रोड, बेतवडे गांव, ता. कल्याण, जि. ठाणे, ३) तस्लीम अमान खान वय २९ वर्षे रा. अ. क्रं. २ प्रमाणे यांना अटक करून त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांचेकडुन घरफोडी चोरीचे खालीलप्रमाणे ०२ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असुन त्यामध्ये एकुण ४,९१,८००/- रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. नमुद गुन्हयात पाहीजे असलेले ०२ आरोपींचा शोध सुरू आहे.

**उघडकीस आलेल गुन्हे व हस्तगत मालमत्ता**

| अ.क्रं | पोलीस स्टेशन | गु. र. क्रं. | हस्तगत मालमत्ता |
|---|---|---|---|
| १) | नारपोली | १०२९/२०२४ भा. दं. सं. कलम ४५४, ४५७, ३८०, २०१, ३४ | २,५३,९७३/- |
| २) | मानपाडा | ५४८/२०२४ भा. दं. सं. कलम ४५७, ३८०, ३४ | ३७,८२७/- |
| | | गुन्हयात वापरलेली वाहने (एक ॲक्टीव्हा मोटर सायकल व एक ऑटो रिक्षा) | २,००,०००/- |
| | | | ४,९१,८००/- |

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. योगश आव्हाड, सपोनि/ श्रीराज माळी, पोहवा/ प्रकाश पाटील, देवानंद पाटील, शशीकांत यादव, वामन भोईर, अमोल देसाई, मपोहवा/ श्रेया खताळ, माया डोंगरे, पोना/सचिन जाधव, पोशि/ उमेश ठाकुर, अमोल इंगळे, भावेश घरत,, सचिन सोनावणे, चापोशि/ रविंद्र साळुंके यांनी केली आहे.

--------०००००---------